**महाराष्ट्र राज्यस्तरीय नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा संवर्ग (गट-क) श्रेणी-ब मधील कर्मचाऱ्यांना पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा संवर्ग (गट-क) श्रेणी-अ मधील पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
क्र.नपप्रस-३/संवर्ग/पदोन्नती/प्र.क्र.६२/२०१८/4495
शासकीय परिवहन सेवा इमारत
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी.
मुंबई - ४०० ०३०
दिनांक २८/११/२०१८
28 NOV 2018

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.११.१०.२०१८ रोजीचे परिपत्रक.

## आदेश

महाराष्ट्र राज्यस्तरीय नगरपरिषद **पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा संवर्ग (गट-क) श्रेणी-ब** (वेतनश्रेणी रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन-४३००) या संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्यस्तरीय नगरपरिषद **पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा संवर्ग (गट-क) श्रेणी-अ** मधील (वेतनश्रेणी रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन-४४००) पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या व याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशास अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | सद्या कार्यरत नगरपरिषद | जिल्हा | पदोन्नतीने पदस्थापना केलेली नगरपरिषद | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सुरेंद्र शा. उईके | रत्नागिरी | रत्नागिरी | कुळगांव बदलापूर | ठाणे |

०२. **उपरोक्त कर्मचाऱ्याना तात्पुरती पदोन्नती ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.**

१) सदर तात्पुरती पदोन्नती ही जे कर्मचारी जेष्ठ आहेत परंतू ज्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आलेली आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या जेष्ठतेस बाधा न आणता देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती ही उपरोक्त कर्मचाऱ्यांची या संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या माहिती व कागदपत्रांच्या आधारे देण्यात आली आहे. त्याबाबत काही विसंगती आढळून आल्यास सदर पदोन्नती रद्द करण्यात येईल.

३) सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना केलेल्या नगरपरिषदेमध्ये हजर राहण्यासाठी दि.३०/११/२०१८ रोजी (मध्यान्होत्तर) कार्यमुक्त करण्यात येत आहे.

28/11/2018

४) उपरोक्त कर्मचाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी दि.०७/१२/२०१८ पर्यंत हजर होणे आवश्यक आहे.

५) दि.०७/१२/२०१८ पर्यंत रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवा जेष्ठता पदोन्नती आदेशाच्या दिनांकापासून धरली जाईल. उपरोक्त कालमर्यादेच्या आत हजर न झाल्यास सदर आदेशातील क्रमानुसार असणारी सेवा जेष्ठता विचारात न घेता सदर कर्मचारी ज्या दिवशी हजर होईल तो दिवस सेवा जेष्ठतेसाठी गृहीत धरला जाईल.

संबंधित कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होवून तसा आपला अहवाल तात्काळ या संचालनालयास मुख्याधिकाऱ्यामार्फत सादर करावा.

संबंधित मुख्याधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१, नियम-११ नुसार पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती करण्यासाठी या संचालनालयाच्या दि.१७.१०.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने**

२८/११/२०१८

**( डी. पी. मोरे )**
**उप संचालक,**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**

**प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**

१. संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक.
२. संबंधित जिल्हाधिकारी.
३. संबंधित नगरपरिषद मुख्याधिकारी.
४. संबंधित कर्मचारी.
५. निवड नस्ती.